# मुंबई विद्यापीठ

आस्थापना – १

क्र.इएसटी/आयसीटी/२०१५–१६/१४१८
मुंबई – ४०० ०३२.
३१ ऑक्टोबर, २०१५.

विषय :– "राष्ट्रीय सेवायोजन कक्षाकरिता मंत्रालयीन स्तरावर निर्माण केलेले राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी" हे पद भरण्याबाबत...

**परिपत्रक :–**

उपरोक्त विषयास अनुसरुन मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत मान्यताप्राप्त महाविद्यालयांचे/संस्थेंचे प्राचार्य यांना याद्वारे कळविण्यात येत आहे की, 'राष्ट्रीय सेवा योजनेचे' काम पाहण्यासाठी केंद्र शासनाच्या निदेशानुसार राज्यस्तरावर मंत्रालयात स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आलेला आहे. या कक्षाचे 'संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी' हे पद केंद्र शासनाच्या निकषानुसार भरण्यात येणार असून इच्छुक व विहित करण्यात आलेली पात्रता पूर्ण करणा–या उमेदवारांनी अर्ज करावा असे सूचित करण्यात येत आहे .

'संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी' या पदासाठी अर्ज करण्यासाठी अटींसंबंधातीतल माहिती मुंबई विद्यापीठाचे संकेतस्थळ www.mu.ac.in वर 'career' या सदरात नमूद केले आहे याची कृपया नोंद घ्यावी.

31/10/15

(डॉ. एम. ए. खान)
**कुलसचिव**

मुंबई ४००० ३२.
३१ ऑक्टोबर, २०१५.

**प्रति,**

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत मान्यताप्राप्त महाविद्यालयांचे/संस्थेंचे प्राचार्य यांस.

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय
मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.
www.dhepune.gov.in E-mail- vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९,२६१२४६३९,२६०५१५१२ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्रमांक- युएनआय/(२१८/१५)/२०१५/नावि/विशि-१ दिनांक- २६ ऑक्टो, २०१५

प्रति,

कुलसचिव
सर्व अकृषि विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य.

**विषय-"राष्ट्रीय सेवायोजन कक्षाकरिता मंत्रालयीन स्तरावर निर्माण केलेले राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी " हे पद भरण्याबाबत.**

संदर्भ- शासनाचे क्रमांक इएसटी४४१५/प्र.क्र.३७७/आस्था-१
दिनांक १९ ऑक्टोबर, २०१५.

उपरोक्त विषयाबाबतचे शासनाचे या संचालनालयास व आपणास पाठविलेले संदर्भिय पत्र पहावे.

वरील संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजनेचे काम पाहण्यासाठी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार मंत्रालयात स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आलेला आहे. या कक्षाचे संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी हे पद केंद्र शासनाच्या निकषानुसार भरावयाचे आहे. सदर पदाची पात्रता खालीलप्रमाणे केंद्र शासनाने निर्धारित केलेली आहे.

१. He/S he should have served as programme Co-ordinator in the University or Programme Officer in a college at least for four years continuously.

२. He/She should possess the academic qualifications for being appointed as programme Co-ordinator as prescribed by the Ministry of Youth Affairs and sports, Government of India.

३. He/She should have interest in Youth work in particular and social work in general.

तसेच इतर अटी खालीलप्रमाणे आहेत.

४. संपर्क अधिकारी हे पद रिडर स्केल (सुधारित वेतनश्रेणी) रुपये ३७४००-६७००० ए.जी.पी- ९००० या संवर्गातील राहील.

५. त्यांचे मराठी, हिंदी आणि इंग्रजी या भाषेवर प्रभुत्व असावे.

६. पात्र उमेदवारांची प्रतिनियुक्तीने वा कंत्राटी पध्दतीने प्रथमत: एक वर्षासाठी नियुक्ती करण्यात येईल आणि त्यानंतर त्या व्यक्तिचा कामाचा आढावा घेऊन मुदतवाढ देता येईल.

७. पात्र उमेदवाराची नियुक्ती मंत्रालयीन आस्थापनेवर असेपर्यंत त्याला शिक्षण विभागाच्या दीर्घ मुदतीचे रजेचे नियम लागू न होता सर्वसाधारण शासकीय कर्मचा-यांचे रजेचे नियम लागू होतील.

८. पात्र उमेदवारांची नियुक्ती प्रतिनियुक्ती पध्दतीने जरी होत असली तरीही त्याची सेवा स्वीयेत्तर (Foreign Services) समजली जाणार नाही. आणि म्हणून त्या व्यक्तिला कोणत्याही प्रकारचा प्रतिनियुक्ती भत्ता (Deputation Allowances) अनुज्ञेय राहणार नाही. फक्त वर दिलेल्या वेतनश्रेणीत महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार त्यांचे वेतन नियमित केले जाईल.

९. पात्र उमेदवाराला राष्ट्रीय सेवा योजनेसंबंधी सर्व प्रकारची प्रशासकीय कामे, विद्यापीठांना वेळेवर अनुदान मंजूर करणे, मंजूर केलेल्या अनुदानाचे लेखा परीक्षण करणे आणि केंद्र शासन विभागीय केंद्र पुणे आणि राज्यातील सर्व विद्यापीठांशी योग्य समन्वय साधावा लागेल. तसेच राज्यातील प्रत्येक विद्यापीठाच्या सल्लागार समितीचा पदसिध्द सदस्य म्हणून प्रत्येक विद्यापीठाच्या सल्लागार समितीच्या बैठकीस उपस्थित रहावे लागेल व वेळोवेळी निर्देशित केलेली कामे पार पाडावी लागतील.

१०. पात्र उमेदवार मुंबई बाहेरील असल्यास त्याला स्वत:ला त्याच्या निवासस्थानाची व्यवस्था करावी लागेल. त्याची जबाबदारी शासनावर राहणार नाही.

वरील अटी विचारात घेऊन राज्यातील पात्र उमेदवारांकडून दिनांक २० नोव्हेंबर, २०१५ पर्यंत विद्यापीठांनी अर्ज मागवावेत. त्याकरिता विद्यापीठांनी सुध्दा त्यांचे स्तरावर स्वतंत्र जाहिरात देण्यात यावी. विद्यापीठांनी त्यांचेकडे प्राप्त झालेले अर्ज या संचालनालयास दिनांक २५ नोव्हेंबर, २०१५ पर्यंत प्राप्त होतील अशा बेताने खालील नमूद केलेल्या तक्तात भरुन आवश्यक ती सर्व कागदपत्रे गोपनीय अहवाल व त्यामधील प्रतवारी नमूद केलेले तसेच आवश्यक त्या सक्षम अधिका-यांनी प्रतिवेदन व पुर्नविलोकन केलेले सह जोडून पाठविण्यात यावी.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत- मा.श्रीमती रोहिणी भालेकर, उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२ यांना माहितीस्तव सादर.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | कार्यरत असलेल्या महाविद्यालय/विद्यापीठाचे नांव | जन्मदिनांक | प्रथम नियुक्ती दिनांक | शैक्षणिक अर्हता | गोपनीय अहवालाची प्रतवारी वर्षेनिहाय | रुपये ३७४००-६७००० ए.जी.पी ९००० या वेतनश्रेणीत वेतननिश्चिती केलेला दिनांक | विद्यापीठामध्ये किंवा महाविद्यालयामध्ये कार्यक्रम अधिकारी पद धारण केलेला दिनांक | विद्यापीठाचे अभिप्राय. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |